# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

**(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)**

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्रं.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय - कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपयायोजना करण्याबाबत.**

**वाचावे** - 1. आपत्ती व्यावस्थापन कायदा, 2005.
2. साथ रोग अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडील आधिसुचनाकोरोना2020/प्र.क्र.58/आरोग्य5 दिनांक 14/03/2020.
4. महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील शुध्दीपत्रक क्रमांक डीएमयु /2020/सीआर/डीएसएम-1 दिनांक 25 मार्च 2020
5. महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील शुध्दीपत्रक क्रमांक डीएमयु /2020/सीआर/डीएसएम-1 दिनांक 3 एप्रिल 2020
6. महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील अधिसुचना क्रमांक डीएमयु /2020/सीआर-92/डीएसएम-1 दिनांक 15 एप्रिल 2020
7. इकडील आदेश क्र/अ१९ कार्या/मपुआव्य.317/2020 दि.16/04/2020

| क्र. आव्यमपु/कार्या 19अ/323/2020 | **आदेश** | अहमदनगर दि. 17/04/2020 |
|---|---|---|

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायादा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3,4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड-19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 4 अन्वये महाराष्ट्र राज्यातील लॉकडाऊन दिनांक 14/04/2020 रोजी पर्यंत वाढविण्यात आलेले होते. त्यामध्ये सदर संदर्भातील क्रमांक 8 अ व ब मध्ये नमुद केलेल्या उद्योगांना / प्रकल्पांना लॉकडाऊन मधून वगळण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.5 अन्वये 8 अ व 8 ब मध्ये नमुद उद्योग / प्रकल्पांना चालू करण्यासाठी परवानगीची आवश्यकता असणार नाही असे नमुद करण्यात आलेले आहे. तसेच संदर्भ क्र. 6 अन्वये मुद्दा क्रमांक 8 ब मध्ये अतिरिक्त उद्योंगाना / प्रकल्पांना समाविष्ठ करण्यात आलेले आहेत त्यानुसार 8 अ ते 8 ग पुढील प्रमाणे आहेत.

**8.अ.** जिवनावश्यक वस्तुंचे उत्पादन करणा-या प्रकल्प ज्यात अन्न व संबंधित वस्तू, साखर, दुग्धशाळा, पशुखाद्य आणि चारा युनिट, फार्मास्युटिकल्स उत्पादन आणि त्यांचा व्यापार करणारे व्यापारी आणि त्यांची वाहतूक, लस, सॅनिटायझर्स, साबण आणि डिटर्जंट्स, मास्क, यांचे उत्पादन आणि वितरण करण्यात गुंतलेले लोक यासह जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनांचे युनिट वैद्यकीय उपकरणे, त्यांची उपकरणे व सहाय्यक सेवा.

**8.ब.** ज्यांना सतत प्रक्रियेची आवश्यकता असते असे उत्पादन प्रकल्प.(मात्र एमआयडीसी कडून तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन जिल्हादंडाधिकारी यांची परवानगी घेतल्यानंतर)

**8.क.** सर्व शेती / बागायती उत्पादनांशी संबंधित प्रक्रिया, पॅकेजिंग व वाहतूक.

**8.ड.** खते, कीटकनाशके व बियाण्याचे उत्पादन व पॅकेजिंग युनिट.

**8.इ.** कोळसा आणि खनिज उत्पादन, वाहतूक, स्फोटकांचा पुरवठा आणि खाणकामांशी संबंधित प्रक्रीया.

**8.फ.**खाद्यपदार्थ, ड्रग्ज, फार्मास्युटिकल आणि वैद्यकीय उपकरणांसाठी पॅकेजिंग मटेरियलचे उत्पादन करणारे प्रकल्प / उद्योग.

**8.ग.**गव्हाचे पीठ, कडधान्य आणि खाद्यतेल इत्यादीसारख्या अत्यावश्यक उपक्रमांच्या निर्मितीमध्ये गुंतलेली सुक्ष्म, मध्यम व लघु उद्योग.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी अहमदनगर साथ रोग अधिनियम 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपरोक्त 8 (अ) ते 8 (ग) च्या अंतर्गत येणाऱ्या सर्व औद्योगिक प्रकल्प / उद्योगांना उत्पादन चालु करण्यासाठी किंवा उत्पादन क्रिया चालू ठेवण्यासाठी कोणत्याही लेखी / इलेक्ट्रॉनिक पूर्व परवानगीची आवश्यकता नसल्याबाबत आदेशीत करीत आहे. सदर प्रकल्प / उद्योगांनी खालील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

**1.**भारत सरकारने माल वाहतुकीस परवानगी दिली असल्याने, सर्व वस्तूंच्या वाहतुकीस (वेअरहाऊस स्टॉकिस्ट - घाऊक - किरकोळ विक्रेता) यांना परवानगीची आवश्यकता नाही.

**2.**त्यासाठी वाहनावरील स्वयंघोषनापत्र (स्टिकर्स) हे पुरेसे मानले जाईल.

**3.**प्रकल्प / उद्योगांनी किमान कर्मचाऱ्यांवर काम केले पाहिजे आणि अंतर्गत स्वच्छता, सामाजिक अंतर,(Social distancing) आरोग्य देखरेख इत्यादी संदर्भात इकडील संदर्भाधीन आदेश क्र.7 अन्वये जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

**4.**उपरोक्त 8 (अ) मध्ये नमुद औद्योगिक प्रकल्प / उद्योग यांना आवश्यक असणारी पॅकेजिंग युनिट चालविण्यास परवानगी राहील.

**5.**या आदेशानुसार सर्व औद्योगिक प्रकल्प / उद्योगांना कच्च्या मालाची अखंडित पुरवठा साखळी सुनिश्चित करण्यासाठी, कच्च्या मालाचे उत्पादन करणाऱ्या सर्व युनिट्सला ऑपरेट करण्याची परवानगी आहे. मात्र कच्च्या मालाचा पुरवठादार या आदेशाच्या तारखेपूर्वी संबंधित उत्पादकांच्या / पुरवठादारांच्या यादीमध्ये असणे आवश्यक आहे. उपरोक्त आदेशाचे उल्लंघन करणा-या कच्चामाल पुरवठादारांचा परवाना रद्द करणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

कोणतीही व्यक्ती / संस्था / संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास ते भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनिय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

जिल्हाधिकारी अहमदनगर

(राहुल द्विवेदी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर**

प्रत - 1) जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
2) आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
3) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
4) उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
5) जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांना प्रसिध्दीकामी.
6) उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)_____________यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी
7) तालुका दंडाधिकारी (सर्व)________________यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी